# डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई

**महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई-३२**

www.hbsu.ac.in ई-मेल: dir.boee@hbsu.ac.in


DBoEE/EXAM/HBSU/२४-२५/१९० **दिनांक: १७/०५/२०२५**

## परिपत्रक

प्रति,
सर्व घटक महाविद्यालयांचे प्राचार्य/संस्था संचालक,
डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई – ३२

**विषय :** अतिरिक्त पुरवणी परीक्षेबाबत...
**संदर्भ:** १) मा. कुलसचिव कार्यालयाचे परिपत्रक क्र. रजि./HBSU/२०२४-२५/१४८ दिनांक ०६/०८/२०२४
२) मा. कुलसचिव कार्यालयाचे पत्र क्र. रजि./HBSU/२०२४-२५/६६८ दिनांक २५/०४/२०२५

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय परिपत्रक १ अन्वये NEP-२०२० बॅच मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता ATKT चे नियम शिथिल करण्यात आलेले असून अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा ह्या त्या-त्या सत्रातील नियमित परीक्षांसोबत घेण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांना विषम सत्रातील परीक्षांमधील अनुत्तीर्ण विषय देण्याची संधी ६ महिन्यांनी व सम सत्रातील परीक्षांमधील अनुत्तीर्ण विषय देण्याची संधी १ वर्षाने उपलब्ध होते. त्यामुळे विशेषतः अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या, नोकरीच्या अथवा अन्य बाबींच्या संधी ह्या ६ महिने अथवा १ वर्षाने पुढे ढकलल्या जातात. त्यामुळे सध्याच्या स्पर्धा युगात त्यांना उच्च शिक्षण अथवा नोकऱ्यांमध्ये वाढीव स्पर्धेस सामोरे जावे लागत आहे.

याबाबींचा विचार करून विद्यार्थ्यांच्या हितास्तव अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षा (Supplementary Examination) ची एक अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळामार्फत प्रस्तावित करण्यात आले होते. त्यास संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये मा. विद्यापरिषदेने मान्यता देण्यात आली आहे. सदर परीक्षांसाठी अटी, पात्रता तसेच परीक्षेचा कालावधी इ. बाबी खालील प्रमाणे असतील.

**१) पदवी (३ वर्षे कालावधी) :** सत्र १ ते ४ च्या परीक्षेमधील सर्व विषय उत्तीर्ण असावेत. सत्र ५ व ६ च्या परीक्षांमधील अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षा सदर पुरवणी परीक्षेमध्ये (Supplementary Examination) देता येतील.

**२) पदवी (४ वर्षे कालावधी) :** सत्र १ ते ६ च्या परीक्षेमधील सर्व विषय उत्तीर्ण असावेत. सत्र ७ व ८ च्या परीक्षांमधील अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षा सदर पुरवणी परीक्षा (Supplementary Examination) मध्ये देता येतील.

**३) पदव्युत्तर (२ वर्षे कालावधी) :** सत्र १ व २ च्या परीक्षेमधील सर्व विषय उत्तीर्ण असावेत. सत्र ३ व ४ च्या नियमित परीक्षांमधील अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षा सदर पुरवणी परीक्षेमध्ये (Supplementary Examination) देता येतील.

**४) पदव्युत्तर पदवी आणि PGD (१ वर्ष कालावधी सत्र पद्धती) :** सत्र १ व सत्र २ च्या नियमित परीक्षांमधील अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षा सदर पुरवणी परीक्षेमध्ये (Supplementary Examination) देता येतील.
**५) पदव्युत्तर पदवी आणि PGD (१ वर्ष कालावधी, वार्षिक परीक्षा पद्धत) :** नियमित परीक्षांमधील अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षा सदर पुरवणी परीक्षेमध्ये (Supplementary Examination) देता येतील.

सदर पुरवणी परीक्षा ह्या नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांनंतर अथवा उन्हाळी परीक्षांच्या पुनर्मुल्यांकन निकालानंतर आयोजित करण्यात येतील. सध्या विशेष प्रयोजनार्थ सुरु असलेल्या अतिरिक्त परीक्षा (वैद्यकीय कारण, क्रीडा, कला इत्यादी सहकारणामुळे संबंधित महाविद्यालयांच्या पूर्व परवानगीने परीक्षांपासून वंचित राहिलेले विद्यार्थी) व प्रस्तावित पुरवणी परीक्षा ह्या एकाच वेळी घेण्यात येतील व त्यासाठी लागणारे विषयनिहाय प्रश्नपत्रिका एकच असतील.

तरी संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरून अवगत करण्यात यावे.

17/5/2025

**प्र. संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

Director, B.o.E.E.
Dr. Homi Bhabha State University, Mumbai
Institute of Science
15, Madame Cama Road,
Mumbai - 32.

प्रत माहितीस्तव:

१) कार्यालय मा. कुलगुरू, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी मुंबई
२) कार्यालय मा. कुलसचिव, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी मुंबई

**डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई**
HBSU
Dr. Homi Bhabha State University
**महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई-३२**
www.hbsu.ac.in ई-मेल: reghbsu@gmail.com

क्र. रजि./HBSU/२०२४-२५/१४८ दिनांक-०६/०८/२०२४

# परिपत्रक

**प्रति,**
**सर्व घटक महाविद्यालयांचे प्राचार्य/संस्था संचालक**
**डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई**

**विषय:** NEP बॅचमधील अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत...

महोदय/महोदया,

डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई च्या सर्व घटक महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्र. एनईपी-२०२२/प्र.क्र.१०५/विशि-३, दिनांक ०६/१२/२०२४ मधील निर्देश क्र. ४ व ८ नुसार एकाधिक प्रवेश आणि बाहेर पडण्याचे (Multiple Entry and Exit) पर्याय देण्यात आला आहे.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, Multiple Entry and Exit पर्याय दिला असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या दृष्टीने NEP बॅचमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता ATKT चे नियम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शिथिल करण्यात येत आहेत. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना Carry On ची सुविधा देण्यात यावी जेणेकरून विद्यार्थी पुढील वर्षात प्रवेश घेऊ शकेल.

तसेच विद्यार्थी स्वेच्छेने एक्झिट पर्यायाचा उपयोग करून नियमानुसार Certificate, Diploma इत्यादी प्राप्त करून बाहेर पडू शकेल. अशा परिस्थितीत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा नियमित परीक्षांसोबत सत्र १, ३, ५, ७ व सत्र २, ४, ६, ८ अशा पद्धतीने होतील. प्रवेशासंबंधीचे इतर नियम जसे की शिस्तभंगाचे नियम, परीक्षेतील फसवणूक वा नकल करणे इत्यादींचे नियम आहेत तसेच राहतील.

Dr. Homi Bhabha State University, Mumbai
Institute of Science, 15-Madame Cama Road, Mumbai 32.

(प्रा. विलास पाध्ये)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव:
कार्यालय, मा. कुलगुरु, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई

महाराष्ट्र शासन

# डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई

महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई-३२

www.hbsu.ac.in ई-मेल:reg@hbsu.ac.in

सत्यमेव जयते

HBSU

Dr. Homi Bhabha State University

रजि./HBSU/२०२४-२५/६६८ दिनांक: - २५/०४/२०२५

प्रति,
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ,
मुंबई – ४०० ०३२

**विषय:** अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त पुरवणी परीक्षेबाबत (Supplementary Examination).

**संदर्भ:** आपले कार्यालयीन पत्र क्र. DBoEE/EXAM/HBSU/२०२४-२५/१६३, दिनांक १८/०३/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय प्रस्तावास अनुसरून कळविण्यात येते की, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP-२०२०) अंतर्गत शिकत असलेल्या बॅचसाठी ATKT संबंधीच्या नियमांमध्ये शिथिलता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने, अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षण, नोकरी अथवा अन्य शैक्षणिक व व्यावसायिक संधी मिळविण्यास विलंब होऊ नये यासाठी अतिरिक्त पुरवणी परीक्षा आयोजित करण्याचा प्रस्ताव उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे सादर आला होता.

सदर प्रस्ताव विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेच्या दिनांक १९ मार्च २०२५ रोजी आयोजित बैठकीमध्ये सादर केला असता विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता मा. विद्यापरिषदेने मान्यता दिली आहे.

विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांसाठी नियमित परीक्षेव्यतिरिक्त एक अतिरिक्त संधी देण्यास मान्यता देण्यात आहे. सदर पुरवणी परीक्षा संबंधित विद्यार्थ्यांसाठी खालील अटींवर आधारित असतील:

**पात्रता अटी :**

१. **पदवी (३ वर्षे कालावधी):**
- सत्र १ ते ४ मधील सर्व विषय उत्तीर्ण असणे आवश्यक.
- सत्र ५ व ६ मधील नियमित परीक्षांतील अनुत्तीर्ण विषयच या परीक्षेत देता येतील.

२. **पदवी (४ वर्षे कालावधी):**
- सत्र १ ते ६ मधील सर्व विषय उत्तीर्ण असणे आवश्यक.
- सत्र ७ व ८ मधील नियमित परीक्षांतील अनुत्तीर्ण विषयच या परीक्षेत देता येतील.

३. **पदव्युत्तर पदवी (२ वर्षे कालावधी):**
- सत्र १ व २ मधील सर्व विषय उत्तीर्ण असणे आवश्यक.
- सत्र ३ व ४ मधील नियमित परीक्षांतील अनुत्तीर्ण विषयच या परीक्षेत देता येतील.

४. **पदव्युत्तर पदवी व PGD (१ वर्ष कालावधी – सत्र पद्धत):**
- सत्र १ व २ मधील नियमित परीक्षांतील अनुत्तीर्ण विषयच या परीक्षेत देता येतील.

५. **पदव्युत्तर पदवी व PGD (१ वर्ष कालावधी – वार्षिक परीक्षा पद्धत):**
- वार्षिक परीक्षेतील अनुत्तीर्ण विषयच या परीक्षेत देता येतील.

कृ.मा.प.

**परीक्षेचे आयोजन :**

- सदर अतिरिक्त पुरवणी परीक्षा नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत आयोजित करण्यात यावी.
- सध्या विशेष प्रयोजनार्थ (वैद्यकीय कारणे, क्रीडा, कला, NSS/NCC, इ.) आयोजित करण्यात येणाऱ्या अतिरिक्त परीक्षांबरोबरच या पुरवणी परीक्षा घेण्यात याव्यात व त्यासाठी विषयानिहाय एकच प्रश्नपत्रिका वापरण्यात यावी.

वरीलप्रमाणे, मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेनुसार सदर निर्णय अंमलात आणण्यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

Dr. Homi Bhabha State University, Mumbai
The Institute of Science
15, Madame Came Road,
Mumbai - 32.

(प्रा. विलास पाध्ये)
कुलसचिव

**प्रत माहितीस्तव:**

कार्यालय, मा. कुलगुरु, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई